# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

**ब-क्षेत्रिय कार्यालय, लिंक रोड, एल्प्रो कंपनी आवार, चिंचवड, पुणे-३३.**

Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in

**दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३**


जावक क्र. - बक्षेका/१/कावि/३६५/२०१८ दिनांक – १८ /०२/२०१८

**विषय – कार्यालयीन कामकाज व शिस्तीबाबत...**

संदर्भ – १.परिपत्रक क्र.प्रशा/तप/१३/कावि/२२२/२०१७, दिनांक १२/०६/२०१७

२.परिपत्रक क्र.नासुके/१/कावि/४/२०१८, दिनांक ०९/०१/२०१८

## परिपत्रक

१. प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. त्याकरिता बायोमेट्रीक थम्ब प्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही बहुतांशी अधिकारी/कर्मचारी कार्यालयीन शिस्तीचे पालन करीत नाहीत. याबाबत मा.आयुक्तसो. यांचेकडील उपरोक्त संदर्भिय क्र.१ चे परिपत्रक प्राप्त झालेले आहे. त्यात नमूद केलेल्या बाबींचे अद्यापही काटेकोरपणे पालन केले जात नाही. तरी सदर परिपत्रकात नमूद केलेल्या अ.क्र.४ बाबत उशीरा आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे किरकोळ/अर्जित रजा खर्ची टाकून त्या आदेशाची नोंद सेवानोंद पुस्तकात घेतली जात नाही व त्याचा अहवाल पुढील महिन्याच्या १५ तारखेपूर्वी प्रशासन विभाग, मुख्य कार्यालयाकडे पाठविला जात नाही. तरी ज्या विभागातील आस्थापना लिपीकांनी बायोमेट्रीक थम्ब प्रणालीनुसार अधिकारी/कर्मचारी उशीरा आलेची कार्यवाही केलेली नाही, त्यांचे माहे फेब्रुवारी-२०१८ चे पगारबील मंजूर (स्वाक्षरी) केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. उपरोक्त संदर्भिय क्र.२ चे परिपत्रकानुसार माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम ४ व ५ मधील तरतूदींची (बाब १ ते १७) अमंलबजावणी केली जात नाही. तरी सर्व शाखाप्रमुख, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आपले विभागाशी संबंधित माहिती अधिकारी अधिनियम २००५ चे कलम ४ व ५ मधील तरतूदींची (बाब १ ते १७) माहिती तात्काळ अद्यायावत करून घ्यावी.

३. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये आपले विभागाशी संबधित येणारे अर्ज महापालिकेच्या ऑनलाईन RTI प्रणालीमध्ये समाविष्ट केले जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे नागरी सुविधा केंद्रास शासनास पाठविणेकामी ऑनलाईन गोषवारा घेता येत नाही. याबाबत सदर विभागाकडून वारंवार ईमेलद्वारे विचारणा केली जाते. तरी आपले विभागातील संबधित कर्मचा-यांनी तात्काळ माहिती अधिकार अर्ज मनपाच्या ऑनलाईन RTI प्रणालीमध्ये घेणेत यावेत.

४. ब-क्षेत्रीय कार्यालयातील सर्व विभागांना समान emailID व Password आहे. त्यानुसार संबधित विभागातील कर्मचा-यांनी रोजच्यारोज ईमेल तपासून आपलेशी संबधित ईमेलवर तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी. यापुढे प्रशासन विभाग, ब-क्षेत्रीय कार्यालयाकडून ईमेल पाठविले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

तरी सर्व शाखाप्रमुख यांनी जे अधिकारी/कर्मचारी वरील बाबींचे पालन करणार नाहीत, त्यांचेविरूध्द शिस्तभंगाची नियमाधीन कारवाई प्रस्तावित करावी व **दरमहा पगारबील मंजूरी/स्वाक्षरी कामी ठेवतानाच वरील नमूद माहितीही सादर करावी, त्याशिवाय पगारबील मंजूर केले जाणार नाही याची नोंद घ्यावी**. सदरचे परिपत्रक नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घेणेत यावी.

**क्षेत्रीय अधिकारी**
ब-क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड-४११०३३.

प्रत – सर्व शाखाप्रमुख,
............... ब-क्षेत्रीय कार्यालय